# DMK JAOLI BANK

## दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक लि.

**(नोंदणी क्र. बी. ओ. एम. / बी. एन. के. / १२७ ऑफ १९७३)**

**प्रशासकीय कार्यालय :** ४१८/२०/२२, मौलाना आझाद रोड, मुंबई-४०० ००४.

**दूर. क्र.:** +९१ २२-२३८२२७७७/ +९१ २२ २३८७०४३७. **फॅक्स :** +९१ २२-२३८५०५१४

**Website: www.jaolibank.in Email ID : hoadmin@jaolibank.in, hoaccounts@jaolibank.in**


# सेहचाळीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची **४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा** रविवार, दिनांक ३०.०६.२०१९ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता शिवास्वामी ऑडिटोरियम ऑफ द फाईन आर्ट सोसायटी, दुसरा मजला, फाईन आर्ट चौक, चेंबूर मोनो रेल्वे स्टेशनजवळ, आर. सी. मार्ग, चेंबूर (पु.) **मुंबई ४०० ०७१**, येथे संपन्न होणार आहे. सदर सभेस सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**❖ सभेपुढील विषय ❖**

१. दिनांक ०५ ऑगस्ट २०१८ रोजी झालेल्या ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. दिनांक ३१ मार्च, २०१९ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, वैधानिक लेखा परीक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा तोटा पत्रकाचे वाचन करून त्यास स्वीकृती देणे.

३. वैधानिक लेखा परिक्षकांचा सन **२०१८-१९** चा वैधानिक लेखा परीक्षण अहवाल व आर्थिक वर्ष **२०१७-१८** च्या वैधानिक लेखा परीक्षण दोष दुरुस्ती अहवालाची (**Compliance Report**) नोंद घेणे.

४. आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या नफा- विभागणीच्या अनुषंगाने बँक संस्थापक वै.ह.भ.प. दत्तात्रय महाराज कळंबे यांचे कार्य प्रसार निधीअंतर्गत नफा वर्ग करण्यास मान्यता देणे.

५. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन **२०१८-१९** सालच्या नफा विभागणीस मान्यता देणे.

६. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन **२०१९-२०** च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

७. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन **२०१९-२०** या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखा परीक्षकांची नेमणूक करणे

८. वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली संशयीत व बुडीत कर्जे येणे बाकी रक्कम संबंधित कर्जदारांकडून करावयाच्या वसुलीचे सर्व अधिकार अबाधित ठेवून निर्लेखन करण्यास मान्यता देणे.

९. संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार बँकेच्या उपविधीचे (Bye-Law) कलम १५ दुरुस्तीस मान्यता देणे (प्रस्तावित उपविधीतील कलम १५ चे दुरुस्तीचा मसुदा संचालक मंडळाच्या अहवालचे पान क्र. ४३ वर देण्यात आलेला आहे.)

१०. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांच्या रजेस मान्यता देणे.

११. मा. अध्यक्षांचे परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

**संचालक मंडळाचे संमतीने**
**श्री. एस.ए.नाईक**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १०.०६.२०१९**

**टीप :**

१. गणसंख्येपूर्ती अभावी सभा तहकूब करावी लागल्यास सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर म्हणजेच सकाळी ठीक १०.३० वाजता सुरू होईल व त्या सभेच्या कामकाजाच्या वेळी गणसंख्यापूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

२. वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुरळीत होण्यासाठी ज्या सभासदांना अहवालासंबंधी काही विधायक स्वरुपाची माहिती विचारावयाची असल्यास त्यांनी त्यासंबंधी बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सभेच्या तारखेपूर्वी किमान सात दिवस अगोदर लेखी कळवावे.

३. बँकेच्या वार्षिक अहवालाची प्रत **www.jaolibank.in** या बँकेच्या वेबसाईटवर व सर्व शाखांत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.